॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥

# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव

'A' Grade NAAC Re-accredited (4th Cycle)

## निविदा सूचना

विद्यापीठाच्या परीक्षा, वित्त विभागासाठी **'विविध आकाराचे प्लॉस्टीक कोटेड (लेजर पेपर) पाकीटे एका बाजूने प्रिंटींगसह खरेदी करीता ०३ वर्ष कालावधीचा वार्षिक दर करार [Annual Rate Contract for Three Years(ARC)] करण्यासाठीची'** कोरी निविदा संपूर्ण माहिती, अटी व शर्तीसह निविदा विद्यापीठाच्या संकेतस्थळावर (**Website: www.nmu.ac.in**) उपलब्ध करुन देण्यात आली आहे. त्यासाठी नोंदणीकृत व पात्र पुरवठाधारकांकडून निविदा विद्यापीठ संकेतस्थळावरून डाऊनलोड करुन परिपूर्णरित्या भरलेली निविदा **दि. १०/०७/२०२५ रोजी सायं. ५.०० वाजेपर्यंत विद्यापीठाच्या परीक्षा व मूल्यमापन मंडळ यांच्या कार्यालयात, कबचौउमवि, जळगाव** येथे कार्यालयीन वेळेत कामकाजाच्या दिवशी जमा करावी.

सदर निविदा सादर करण्यासाठी शुध्दीपत्रक अथवा मुदतवाढ दिल्यास त्या संबंधीची सूचना फक्त विद्यापीठाच्या वरील संकेत स्थळावर प्रसिध्द करण्यात येईल.

जा.क्र.: कबचौउमवि/७-फ/पाकीट छपाई निविदा/१७८०/२०२५

दिनांक :१८/०६/२०२५

**(सीए रवींद्र एन. पाटील)**
वित्त व लेखाधिकारी

|| अंतरी पेटवू ज्ञानज्योत ||
कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव
Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University,Jalgaon

POST BOX NO.80, UMAVINAGAR, JALGAON- 425 004
Tel.No. (0257) 2257321 ते 323 E-mail id : dbee@nmu.ac.in ; vasantvalvi999@gmail.com,

# विविध रंगाचे प्लॉस्टीक कोटेड (लेजर पेपर) पाकीटे एका बाजूने प्रिटींगसह खरेदी करिता 03वर्षे कालावधीचा वार्षिक दर करार (Annaual Rate Contract for three year-ARC) करण्यासाठीची निविदा.

(Tender document for Supply of various Colours of Envelope with Plastic Coated One Side Printing)

**पेजेस क्र . 01 ते 07**

**भाग -1 ते 4**

**(भाग- 1 ते 3- पा.क्र. 1 ते 6 )**

**(भाग- 4 पा.क्र. 7 )**

जा.क्र .कबचौउमवि /7-फ/ पाकिट छपाई निविदा/1780/2025, दि.16/06/2025

निविदा सादर करण्याची अंतिम दि. 10/07/2025.

**निविदा किंमत रुपये 500/-**

|| **अंतरी पेटवू ज्ञानज्योत** ||

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव

# विविध रंगाचे प्लॅास्टीक कोटेड (लेजर पेपर) पाकीटे एका बाजूने प्रिटींगसह खरेदी करिता 03वर्षे कालावधीचा वार्षिक दर करार (Annaual Rate Contract for three year-ARC) करण्यासाठीची निविदा.

| | | | |
|---|---|---|---|
| 1) | निविदा सुचना संदर्भ व तारीख | :- | जा. क्र.: कबचौउमवि/7-फ/पाकिट छपाई निविदा/1780/2025,<br>दि. 16 /06 /2025 |
| 2) | पुरवठादाराचे नांव व संपूर्ण पत्ता | :- | |
| 3) | दुरध्वनी, भ्रमणध्वनी व ई-मेल आयडी | :- | |
| 4) | व्यवसायातील अनुभव | :- | |
| 5) | * शॉप ॲक्ट रजिष्ट्रेशन क्रमांक<br>(स्वाक्षांकीत प्रत जोडावी) | :- | |
| 6) | * जी.एस.टी. (GST) नोंदणी क्रमांक<br>(स्वाक्षांकीत प्रत जोडावी) | :- | |
| 7) | * पॅन कार्ड क्रमांक (स्वाक्षांकीत प्रत जोडावी) | :- | |
| 8) | * मागील तीन वर्षाची वार्षिक उलाढाल पत्रके (सनदी लेखापरीक्षकांनी प्रमाणित केलेले UDIN सह जोडणे आवश्यक) | :- | |
| 9) | निविदा किंमत व बयाणा रक्कमेचे धनाकर्ष क्रमांक, तारीख/ऑनलाईन भरणा केल्याची पावती जोडावी. | :- | |
| 10) | सध्या कोणकोणत्या संस्थांना निविदेतील नमूद साहित्य पुरवठा करतात त्याचा तपशिल (सोबत ग्राहकांची यादी जोडावी) | :- | |
| 11) | कंपनीचे अधिकृत विक्रेते आहात त्याचा तपशील देऊन त्या संबधीचे कंपनीचे प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे. | :- | |

(* चिन्हांकित रकान्यासाठी सत्यप्रती जोडणे आवश्यक आहे.)

स्थळ :-

दिनांक :- . .2025

निविदाधारकाची सही व शिक्का

|| अंतरी पेटवू ज्ञानज्योत ||
कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव
Tel.No. (0257) 2257321 ते 323 E-mail id : dbee@nmu.ac.in ; vasantvalvi999@gmail.com,

जा. क्र.: कबचौउमवि/7-फ/पाकिट छपाई निविदा/ /2025, दि. /06/2025

# विविध रंगाचे प्लॅस्टीक कोटेड (लेजर पेपर) पाकीटे एका बाजूने प्रिटींगसह खरेदी करिता 03वर्षे कालावधीचा वार्षिक दर करार (Annaual Rate Contract for three year-ARC) करण्यासाठीची निविदा.

(Tender document for Supply of various Colours of Envelope with Plastic Coated One Side Printing)

## भाग - 2

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव या कार्यालयाकरिता खालील निविदा अटी व शर्ती वर्णनानुसार इच्छुक निविदाधारकाकडून सिलबंद पाकिटातून भाग-1 ते 4 मध्ये निविदा किंमत व बयाणा किंमतीसह निविदा मागविण्यात येत आहे. **सिलबंद निविदा कार्यालयीन वेळेत विद्यापीठाच्या परीक्षा विभागाच्या आवक विभागात ( परीक्षा भवन इमारतीच्या कक्ष क्र. 803) दिनांक 10/07/2025 किंवा तत्पूर्वी जमा करावे.** निविदा पाकिटावर च्याकिटे पुरवठ्यासाठीची निविदाछ असे स्पष्ट नमूद करावे. (सोबत पुरवठा करणाऱ्यात येणाऱ्या पाकिटांचे नमूने जीएसएम व पुरवठादाराचे नावे, संपर्क क्र.ई-मेल आयडी इ. माहिती नमूद करावी.)

## निविदे संबंधीच्या सर्वसाधारण अटी व शर्ती

१) निविदेसोबत निविदा किंमत रू.500/-(अक्षरी रू. पाचशे मात्र) व बयाणा रक्कम रू.5,000/-(अक्षरी रू. पाच हजार मात्र) चा मा. वित्त व लेखा अधिकारी, कबचौउमवि, जळगांव (Finance and Accounts Officer, K.B.C.N.M.U.,Jalgaon) यांच्या नावाने ICICI Bank टाकरखेडा शाखा, जळगाव बचत खाते क्रमांक **037501008945** (**IFSC Code- ICICI0008464**) या खाते क्रमांकावर ऑनलाईन भरणा करावी लागेल. ऑनलाईन पध्दतीने भरणा करताना काही तांत्रिक अडचणी निर्माण झाल्यास निविदाधारक हे राष्ट्रीयकृत बँकेचे धनाकर्षाव्दारे सुध्दा भरणा करू शकतील. निविदा प्रक्रियेत सहभागी होण्यासाठी निविदा शुल्क व बयाणा रक्कमेचा भरणा करणे आवश्यक राहिल.

२) वस्तू व सेवा कर (GST) कायद्यानुसार नोंदणीधारक निविदाधारकांचीच निविदा विचारात घेतली जातील.

३) सदरची संपूर्ण निविदा ही दोन भागात तांत्रिक निविदा (Technical Bid) व दरांची निविदा (Price Bid) मध्ये विभागलेली असून तांत्रिक निविदे अंतर्गत भाग 1 ते 3 भाग समाविष्ट आहेत व भाग-4 मध्ये (Price Bid) समावेश आहे. निविदा भाग 1 ते 3 मधील कागदपत्रे एका A-4 साईजच्या स्वतंत्र मोठया पाकीटात टाकून त्यामध्ये दरांचा भाग-4 हा स्वतंत्र लहान पाकीटात टाकून दोन्ही सिलबंद पाकिटे एकत्रितरित्या जमा करावेत.
सिलबंद निविदा पाकिटावर **पाकिटांची निविदा** (भाग 1 ते 3 व भाग-4) असे स्पष्ट नमूद करावे. निविदा पाकीटांवर स्पष्ट उल्लेख नसल्यास त्याचप्रमाणे सिलबंद पाकिटा सोबत पुरविण्यात येणाऱ्या नमुना पाकीटे (सॅम्पल) नसल्यास दरांची निविदा विचारात घेतली जाणार नाही.

४) कोणत्याही कारणास्तव विहीत मुदतीनंतर उशिरा प्राप्त झालेल्या निविदांचा विचार केला जाणार नाही.

५) निविदेतील दर हे सर्व करांसह विद्यापीठ कार्यालयात पोहोच करावे लागेल.

६) निविदा मान्य करताना फक्त दरांचाच विचार केला जाणार नसून मालाचा दर्जाचा, निविदाधारकांच्या दर्जाचा, निविदाधारकांच्या पुरवठादाराच्या सेवासंहितेच्या संबंधातील मागील अनुभव इ. बाबींचा विचार केला जाईल व त्यानुसार पुरवठादाराची निवड केली जाईल, त्यावेळी कामाचा दर्जा प्राधान्याने विचारात घेण्यात येईल.

७) विद्यापीठाने दिलेल्या मागणी प्रमाणे पाकिटांचा पुरवठा करणे पुरवठादारास बंधनकारक राहील. त्याच बरोबर भाग-3 सोबत सॅम्पल पाकीटांचा नमूना जोडणे आवश्यक आहे. प्रत्येक नमुन्यावर त्याचा GSM व कंपनीचे नाव व कंपनीचा शिक्का नमूद करणे पुरवठादारासाठी बंधनकारक राहतील.

८) निविदेत नमूद दर हे निविदा उघडण्याच्या तारखेपासून तीन वर्षाच्या कालावधीपर्यंत वैध (Valid) असतील. विद्यापीठात सदर निविदेत भरलेले दर हे किमान दरांची निविदा (L-1) सादर करणाऱ्या पुरवठादारासाठी बंधनकारक राहिल.

९) पुरवठा आदेश दिल्यावर प्रारूप मसुदा (Proof/Art Work) अंतीम रित्या तपासणी करून दिल्याच्या तारखेपासून 30 दिवसांत संपूर्ण साहित्याचा पुरवठा करणे बंधनकारक राहिल.

१०) ज्या निविदाधारकांची निविदा मंजूर झाली त्यांनी कार्यादेश/खरेदी **आदेशाच्या 5% इतकी रक्कम ही विद्यापीठाचे पत्र प्राप्त झाल्यापासून 07 दिवसांच्या आत सुरक्षा अनामत** (Security Deposit) **म्हणून भरणा करावी लागेल**. त्यासाठी वित्त व लेखा अधिकारी, कबचौउमवि, जळगांव (Finance and Accounts Officer, KBCNMU, Jalgaon) यांच्या नावाने राष्ट्रीयकृत बॅकेच्या धनाकर्षाद्वारे स्वतंत्ररित्या जमा करावयाची आहे. किंवा यांच्या नावाने ICICI Bank टाकरखेडा शाखा,जळगाव बचत खाते क्रमांक **037501008945 IFSC Code-ICICI0008464** या खाते क्रमांकावर ऑनलाईन भरणा करावी लागेल.सदरची रक्कम ही विनाव्याजाने राहिल.

११) ज्या निविदा धारकांची निविदा स्विकृत केलली जाईल अशा निविदाधारकाने विहीत कालावधीत पाकिटांचा पुरवठा करण्यासाठी निर्गमित खरेदी आदेशाचा स्विकार करण्यास, मालाचा पुरवठा करण्यास नकार दिल्यास किंवा हलगर्जीपणा/ टाळाटाळ अथवा दिरंगाई केल्यास निविदेसोबत सादर केलेली बयाणा रक्कम व सुरक्षा अनामत रक्कम कायमस्वरूपी जप्त करण्यात येईल व संबंधित पुरवठादारांच्या फर्मचे नाव कायमस्वरुपी पुरवठादारांच्या काळया यादीत (Black List) समाविष्ट करण्यात येईल. तसेच खरेदी आदेशापोटी अग्रीम रक्कम दिली जाणार नाही. खरेदी आदेशातील नमूद साहित्याचा संपूर्ण पुरवठा झाल्यानंतर देयक अदायगीची कार्यवाही करण्यात येईल.

१२) आदेशातील वर्णनाबरहुकुम व नमुन्याप्रमाणे पाकिटे स्वीकारले जाईल. नमून्यानुसार साहित्याचा पुरवठा प्राप्त न झाल्यास अशा पुरवठादाराचा खरेदी आदेश रद्द केला जाऊन सुरक्षा/बयाणा अनामत रक्कम जप्त केली जाईल. स्वीकारण्यात आलेल्या साहित्याचे पेमेंट अदायगी केली जाणार नाही.

१३) संबंधित विभागाकडून वस्तू/सेवा समाधानकारक मिळाल्याच्या अहवाल प्राप्त झाल्यानंतर देयकाची अदायगी करण्यात येईल. आवश्यक तेथे शासकीय करांची कपात देयकातून परस्पर करण्यात येईल.

१४) निविदेत काही बदल झाल्यास अथवा मुदतवाढ दिल्यास, शुध्दीपत्रक अथवा सूचना निर्गमित करावयाची झाल्यास सदरचे शुध्दीपत्रक हे विद्यापीठाचे संकेतस्थळ www.nmu.ac.in वर प्रसिध्द करण्यात येईल. त्यासाठी स्वतंत्र पत्रव्यवहार करण्यात येणार नाही अथवा असा पत्रव्यवहार विचारात घेतला जाणार नाही.

१५) प्राप्त दरपत्रकात किमान दर नमूद केलेल्या पुरवठादारांशीच संपर्क करण्यात येईल. त्यामुळे दर नमूद करतांना अवास्तव दर नमूद करू नयेत.

१६) निविदे संदर्भातील अतिरिक्त माहितीसाठी. (अ) परीक्षा गोपनीय (पूर्वाध) विभाग-दूरध्वनी क्रमांक :0257-2257321/ 322/ 323 या दुरध्वनी क्रमांकावर कार्यालयीन वेळेत संपर्क साधावा.

१७) **आवश्यकता भासल्यास पुरवठादारांना प्रत्यक्ष पाकिटांची विद्यापीठातील उपलब्ध नमून्याची पाहणी करता येईल. आवश्यकतेनुसार पाकीटांचे नमुने** (Sample) **जोडावा लागेल**.

१८) निविदेत नमूद मागणीची संख्या कमी अथवा जास्त करण्याच्या अधिकार विद्यापीठाने राखून ठेवलेला आहे.

१९) निविदेतील तपशिलात बदल करण्याचा, रद्द करण्याचा, दुरूस्ती करण्याच्या तसेच प्राप्त संपूर्ण निविदा नाकारण्याच्या अथवा स्वीकारण्याचा संपूर्ण अधिकार विद्यापीठाने राखून ठेवलेला आहे.

२०) अग्रीम स्वरूपात कुठलीही रक्कम मिळणार नाही. तसेच खरेदी आदेशातील संपूर्ण साहित्याचा पुरवठा करावा. त्यासाठी विद्यापीठाच्या प्रचलित कार्यपध्दतीनुसार GSM तपासणीचा अहवाल प्राप्त झाल्यानुद देयकाची अदायगी करण्यात येईल.

२१) देयक सादर करतांना विद्यापीठाचा GST No. 27AAAJNO465A1ZL चा उल्लेख करून पक्के बिल द्यावे लागेल.. GST ची भरणा रक्कम पडताळणी केल्यानंतर अदा करण्यात येईल.

२२) साहित्य/ पाकीटांच्या सेवेच्या गुणवत्तेमध्ये तफावत/फरक आढळल्यास बिलाची अदायगी करण्यात येणार नाही

२३) जे निविदाधरक बयाणा रक्कम (Tender Earnest Money Deposit) व निविदा किंमत (Tender Cost) मध्ये सुट मिळण्यास पात्र आहेत त्यांनी SSI/NSIC/MSME यांचे नोंदणी प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहिल.

२४) निविदा सादर केल्यानंतर साहित्य पुरवठा करण्यास नकार दिल्यास तसेच वेळोवेळी विद्यापीठाच्या गरजेनुसार साहित्य पुरविल्यास किंवा त्यास दिरंगाई केल्यास किवा करारात नमूद वर्णनानुसार साहित्याचा पुरवठा न केल्यास विद्यापीठाने करार संपुष्टात आणण्याचा अधिकार राखून ठेवलेला आहे. अशा स्थितीत सदर निविदाधारकांची सुरक्षा अनामतीची रक्कम कायमस्वरूपी जप्त करण्यात येईल व खुल्या बाजारातून सदर साहित्य खरेदी केले जाईल व सदर व्यवहारात विद्यापीठास नुकसान पोहोचल्यास सदर तुट संबंधित निविदाधारकाकडून वसुल करण्यात येईल.

२५) निविदा उघडतांना प्रथम तांत्रिक निविदा (भाग -1, 2 व 3) उघडण्यात येईल. तांत्रिक निविदेत नमुद तपशील, दस्तऐवज इ. योग्य व तांत्रिकदृष्टया पात्र असल्यास त्या निविदाधारकांच्या दरांची निविदा (Price Bid) उघडण्यात येईल. तांत्रिक निविदेतील तपशिल, दस्तऐवजे परिपुर्ण व योग्य नसल्यास अशा निविदाधारकांच्या दरांच्या निविदेचा(भाग- 4 ड Price Bid) उघडण्यात येणार नाही.

२६) सशर्त (Conditional) निविदा स्वीकारले जाणार नाहीत.

२७) कोणतेही कारण न देता निविदा स्विकारण्याचा, फेटाळण्याचा, वरील अटीत संपूर्ण किंवा अंशत: बदल करण्याचा, खरेदी आदेशातील साहित्याच्या संख्येत बदल करण्याचा, कमी अथवा जास्त संख्येने खरेदी करणे किंवा खरेदी आदेश संपुष्टात आणण्याचा संपूर्ण अधिकार विद्यापीठाने राखून ठेवला आहे.

२८) संभाव्य वादविवाद जळगांव न्यायालयाच्या कक्षे अंतर्गतच विचाराधीन राहतील.

२९) निविदेत नमूद अटी आणि शर्तीपैकी कोणत्याही किंवा त्याच्या काही भागाअंतर्गत किंवा त्यांच्याशी संबंधित उद्भवणारे कोणतेही मतभेद किंवा वाद हे करारकर्ता / खरेदीदार आणि निविदाधारक हे थेट वाटाघाटीव्दारे सौहार्दपूर्णपणे सोडवण्याचा सर्वतोपरी प्रयत्न करतील. निविदेच्या अनुषंगाने निर्माण होणारे मतभेद विद्यापीठाच्या मा.कुलगुरुंकडे पाठवू शकतात आणि त्यांचा निर्णय दोन्ही पक्षांना बंधनकारक असेल याबाबतचा विद्यापीठाचा सर्वस्वी अधिकार अबाधित असेल.

३०) करारनामा (Agreement):- ज्या निविदाधारकाची निविदा स्विकृत केली जाईल त्यांनी Rs.200/- च्या Stamp Paper वर विहित नमुन्यातील करारनामा करुन देणे बंधनकारक राहील.

(सीए रविंद्र एन. पाटील)
वित्त व लेखा अधिकारी
कबचौउमवि, जळगांव

स्थळ :- जळगांव
दिनांक :- 18.06.2025

निविदा अटी व शर्ती मान्य असल्याबाबत निविदा धारकाची सही व शिक्का

# विविध रंगाचे प्लॉस्टीक कोटेड (लेजर पेपर) पाकीटे एका बाजूने प्रिटींगसह खरेदी करिता 03वर्षे कालावधीचा वार्षिक दर करार (Annaual Rate Contract for three year-ARC) करण्यासाठीची निविदा.

(Tender document for Supply of various Colours of Envelope with Plastic Coated One Side Printing)

**निविदा भाग -3 (Technical Bid) Details of Envelope**

| Sr. No. | Item Description | Qty. | Make of Paper & GSM to be specified by the tender |
|---|---|---|---|
| परीक्षा- गोपनीय (पुर्वार्ध) विभागासाठी लागणारे पाकीटांचा तपशील | | | |
| 01 | Sealing Envelope with Plastic Coated size 11छx5.5छ One Side Printing on Color Paper.<br>Yellow: A Press (100 GSM)<br>Yellow: A DBEEऊ (105 GSM)<br>Yellow : A SOM & Model Answer (100 GSM) | 1,50,000 | |
| 02 | Sealing Envelope with Plastic Coated size 11छx5.5छ One Side Printing on Color Paper.<br>Pista : B Press (100 GSM)<br>Pista : B DBEEऊ (100 GSM)<br>Pista : B SOM & Model Answer (100 GSM) | 1,50,000 | |
| 03 | Sealing Envelope with Plastic Coated size 11छx5.5छ One Side Printing on Color Paper.<br>Pink : C Press (100 GSM)<br>Pink : C DBEEऊ (100 GSM)<br>Pink: C SOM & Model Answer (100 GSM) | 1,50,000 | |

**( निविदेतील अट क्र. 17 नुसार सर्व सॅम्पलची पाहणी करणे आवश्यक राहील )**

निविदाधारकाची सही व शिक्का

# विविध रंगाचे प्लॉस्टीक कोटेड (लेजर पेपर) पाकीटे एका बाजूने प्रिटींगसह खरेदी करिता 03वर्षे कालावधीचा वार्षिक दर करार (Annaual Rate Contract for three year-ARC) करण्यासाठीची निविदा.

(Tender document for Supply of various Colours of Envelope with Plastic Coated One Side Printing)

## निविदा भाग - 4 ( Price- Bid)

| Sr. No. | Item Description | Qty | Rate with GST (Per Thousand) |
|---|---|---|---|
| परीक्षा- गोपनीय (पुर्वार्ध) विभागासाठी लागणारे पाकीटांचा तपशील | | | |
| 01 | Sealing Envelope with Plastic Coated size 11"x5.5"<br>One Side Printing on Color Paper.<br>Yellow : A Press (100 GSM)<br>Yellow : A DBEE's (105 GSM)<br>Yellow : A SOM & Model Answer (100 GSM) | 1,50,000 | |
| 02 | Sealing Envelope with Plastic Coated size 11"x5.5"<br>One Side Printing on Color Paper.<br>Pista : B Press (100 GSM)<br>Pista : B DBEE's (100 GSM)<br>Pista : B SOM & Model Answer (100 GSM) | 1,50,000 | |
| 03 | Sealing Envelope with Plastic Coated size 11"x5.5"<br>One Side Printing on Color Paper.<br>Pink : C Press (100 GSM)<br>Pink : C DBEE's (100 GSM)<br>Pink : C SOM & Model Answer (100 GSM) | 1,50,000 | |

**( निविदेतील अट क्र. 17 नुसार सर्व सॅम्पलची पाहणी करुन दर भरणे आवश्यक आहे.)**

Place :

Date :- . .2025

Seal & Signature of the tenderer